2 6 APR 2026

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय परिषदेत बोलताना दिनेश कुलकर्णी. समवेत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, नामदेव परीट, राजेंद्र माने, जालिंदर पांगरे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक उद्योगांवर भर द्यावा

## दिनेश कुलकर्णी; शाश्वत शेतीवर परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शेतकऱ्यांच्या अडचणी शेतकऱ्यांपुरत्या मर्यादित न राहता आता तो समाजाचा प्रश्न बनला आहे. पशुपालन व शेती याची सांगड घातली पाहिजे. प्रगती साधण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक उद्योगांवर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी' विषयावर विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये आयोजित एकदिवसीय परिषदेत ते बे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलकर्णी म्हणाले, 'विकसित भारतस्वप्न घेऊन पुढे जाताना शेती समृद्ध करीत असताना ते शाश्वत पद्धतीने होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. शेतकरी भरणपोषण करणारा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू होता. शेती, पशुपालन, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचणे हे महत्त्वाचे आहे.'

व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे म्हणाले, 'शेतीमधील ज्ञान कमी होत आहे. शेती किंवा कृषी व्यवसायाला अपेक्षित सन्मान मिळत नाही. उत्पन्नाचे स्रोत मर्यादित होत आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या योजना आणि सहाय्य याची माहिती शेतकऱ्यांना होणे आवश्यक आहे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, 'शेतकऱ्यांनी मूल्यवर्धीत उत्पादन घेऊन त्याचे योग्य पद्धतीने मार्केटिंग करून प्रगती साध्य केली पाहिजे. डॉ. उर्मिला दशवंत यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी कृषी उपसंचालक नामदेव परीट, राजेंद्र माने, जालिंदर पांगरे, डॉ. विद्यासागर गेडाम, डॉ. नितीन माळी, डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. इराण्णा उडचान, डॉ. स्नेहल खांडेकर उपस्थित होते.

2 6 APR 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर डॉ. निमट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) पुरस्कृत उमेदवार डॉ. आर. के. निमट यांची शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली. प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. या निवडीमुळे 'सुटा'ने प्रशासकीय आणि कायदेशीर स्तरावर दिलेल्या लढ्याला यश मिळाले आहे. डॉ. निमत यांच्या निवडीसाठीच्या कायदेशीर लढ्यामध्ये डॉ. ज्ञानेश्वर काळे, डॉ. मनोज गुजर, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. आर. जी. कोरबू यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. प्रा. ए. बी. पाटील, डॉ. अरुण शिंदे, डॉ. निवास वरेकर यांच्यासह 'सुटा'च्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



2 6 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतीसमोरील आव्हाने पेलण्यासाठी एकत्र यावे

## बसवराज मास्तोळी यांचे उद्घाटनप्रसंगी प्रतिपादन : शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी एकदिवसीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळा

**जनप्रवास : कोल्हापूर**

शेतीसमोरील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषी विभाग, विद्यापीठ आणि इतर सर्व संबंधित संस्थांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कोल्हापूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी यांनी केले. महाराष्ट्र शासन कृषी विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि प्रकल्प संचालक 'आत्मा', कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "शाश्वत शेती – समृद्ध शेतकरी" या एकदिवसीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगारे यांनी उपस्थितांचे स्वागत करतानाच कृषी विभागाच्या विविध योजना आणि खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचे सविस्तर सादरीकरण केले.

या कार्यशाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे शितल पाटील, डॉ. स्नेहल खांडेकर, डॉ. इराण्णा उडचान, प्रा. डॉ. पी. डी. पाटील आणि सिद्धार्थजी शिंदे लिखित 'भरड धान्यांचा चमत्कार : स्थानिक धान्ये आणि आधुनिक आश्चर्य' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. इराण्णा उडचान यांनी पुस्तकामागची भूमिका स्पष्ट करत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेशजी कुलकर्णी यांनी कृषी क्षेत्राची सद्यस्थिती, भविष्यातील वाटचाल आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये कृषी क्षेत्राचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व यावर मार्गदर्शन करून उपस्थितांना प्रोत्साहित केले.

कार्यशाळेतील तांत्रिक सत्रांमध्ये तज्ज्ञांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, प्रादेशिक ऊस व गुळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम, केव्हीके तळसंदेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयवंत जगताप, आयसीएआर पुणे येथील डॉ. संकेत मोरे, प्रादेशिक नारळ संशोधन केंद्र भाट्ये येथील कृषी विद्यावेत्ता डॉ. के. व्ही. मालशे, कृषी उपसंचालक नामदेव परीट, केव्हीके कणेरीचे डॉ. वाक्रे आणि शास्त्रज्ञ डॉ. शांतीकुमार पाटील यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या सत्रांमध्ये ऊस, भात, सोयाबीन, भाजीपाला व मसाला पिकांचे लागवड तंत्रज्ञान, सेंद्रिय कर्ब वाढ, मित्र कीटक, सेंद्रिय कीटकनाशक पद्धती, कुक्कुटपालन आणि अन्नप्रक्रिया उद्योगासह पीएमएफएमई आणि कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

या महत्त्वपूर्ण कार्यशाळेला शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगारे, कृषी उपसंचालक नामदेव परीट, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी पोपट पाटील (कोल्हापूर) व किरण पाटील (गडहिंग्लज) यांच्यासह सर्व तालुक्यांचे तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते. कार्यशाळेचा समारोप प्रभारी कुलगुरूंच्या प्रमुख उपस्थितीत झाला आणि शेवटी डॉ. उर्मिला दशवंत यांनी सर्व मान्यवर, मार्गदर्शक तज्ज्ञ व उपस्थित शेतकरी बांधवांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यक्रम राबवा

मास्तोळी यांनी आपल्या भाषणात कृषी विभाग, शिवाजी विद्यापीठ, 'आत्मा' आणि 'उमेद' यांसारख्या संस्थांनी भविष्यातही शेतकऱ्यांच्या हितासाठी असे संयुक्त कार्यक्रम राबवावेत, असे आवाहन केले. याच सत्रात यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेचे प्र. संचालक डॉ. नितीन माळी यांनी ग्रामीण विकास शिक्षणातील संधींचा आढावा घेतला.

2 6 APR 2026

लोकमत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षेसाठी ३१ मे पर्यंत अर्जाची मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांसाठी अर्ज करण्यासाठी ३१ मेपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एम.एस्सी. आणि तत्सम अभ्यासक्रमांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा आवश्यक आहे, त्या अभ्यासक्रमांच्या भाग-एक प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २७ एप्रिल अशी निश्चित केली आहे. ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही, अशांसाठी ३१ मेपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

2 6 APR 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात डॉ. नितीन माळी यांच्या हस्ते 'द मिऱ्याकल ऑफ मिलेटस् : लोकल ग्रेन्स्, मॉडर्न वंडर्स' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. डॉ. ज्योती जाधव, दिनेश कुलकर्णी, बसवराज मास्तोळी, नामदेव परीट, आदी उपस्थित होते.

# 'द मिऱ्याकल ऑफ मिलेटस्' पुस्तकाचे विद्यापीठात प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, राज्य सरकारचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघाच्या शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी या विषयावरील परिषेदत यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'द मिऱ्याकल ऑफ मिलेट्स : लोकल ग्रेन्स्, मॉडर्न वंडर्स' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये आयोजित या समारंभात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी, कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी, कृषी उपसंचालक तथा जिल्हा नोडल अधिकारी नामदेव परीट, राजेंद्र माने, जिल्हा कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्रप्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम उपस्थित होते.

या पुस्तकात विविध भरड धान्यांचे वर्गीकरण, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय तसेच देशस्तरीय उत्पादन स्थिती, पोषणमूल्य त्यावर आधारित मूल्यवर्धित उत्पादने आणि त्यांचे आरोग्यदायी फायदे, यांचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. यासाठी शितल पाटील, डॉ. स्नेहल खांडेकर, डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. इराण्णा पाटील आणि व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी सहकार्य केले.